पर्यटन विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडीत पर्यटन व बुध्दीस्ट स्थळांचा समावेश असलेल्या टूर सर्कीटस् ची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

**सहलीचे आरंभ व शेवटचे ठिकाण:**

१. नाशिक -पर्यटन भवन, शाशकीय विश्राम गृहा जवळ, गोल्फ क्लब.

वेळ: सकाळी 09:30 वा.

२. मुंबई- गणेश मंदिर शिवाजी पार्क

वेळ: सकाळी 09:00वा.

३. नागपूर- यशवंत स्टेडियम धंतोली.

वेळ: सकाळी 07:00 वा.

**अ) मुंबई टूर सर्कीट :**

**१. चैत्यभूमी :**

मुंबईतील दादर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक व महापरिनिर्वाण स्थळ हे चैत्यभूमी म्हणून ओळखले जाते. चैत्यभूमी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांसाठीच नव्हे तर जगातील सर्वांसाठी आदरणीय तीर्थक्षेत्र आहे, दिनांक ६ डिसेंबर रोजी त्यांच्या महापरिनिर्वाण दिनी दरवर्षी लाखोंच्या संख्येने अनुयायी भेट देतात.

**२. राजगृह** :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक आणि घर हे मुंबईतील दादर हिंदू कॉलनी येथे आहे. याचे नाव राजगृह हे प्राचीन बौद्ध राजाच्या नावावरून देण्यात आले आहे. या तीन मजली इमारतीच्या तळमजल्यावर त्यांचे स्मारक म्हणून वारसा संग्रहालय आहे.

**३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन :**

सन १९३० मध्ये, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दादरच्या मध्यभागी जागा घेऊन वास्तू उभारली. जातीय विरोधी साहित्य छापण्यासाठी आणि प्रसारित करण्यासाठी सदर वास्तूमध्ये प्रेस आणि लायब्ररी स्थापन केली.

**४. परळची बीआयटी चाळ**:-

ही १०० वर्षे जुनी चाळ आहे जेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वास्तव्य होते. ही चाळ १८९० मध्ये कारखान्यातील कामगारांसाठी बांधण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वडील, सैन्यातील सुभेदार, हे मुंबईतील या चाळीतील दुसऱ्या मजल्यावरील खोलीत वास्तव्यास होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शालेय व महाविद्यालयीन शिक्षण याच चाळीत राहून घेतले.

**५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर इकॉनॉमिक्स व कॉमर्स कॉलेज, वडाळा**

डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ इकॉनॉमिक्स हे मुंबईच्या मध्यवर्ती वडाळा येथे स्थित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याद्वारे स्थापित पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या छत्राखाली हे कॉलेज जून १९७२ साली सुरु करण्यात आले. समाजातील वंचित घटकांमध्ये उच्च शिक्षणाद्वारे ज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने महाविद्यालय सुरु करण्यात आले.

**ड) नागपूर टूर सर्कीट :**

१. **दीक्षाभूमी :** दीक्षाभूमी हे भारतीय बौद्ध धर्मीयांचे एक श्रध्दास्थान आहे. हे स्थळ महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर शहरात आहे. या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दि. १४ ऑक्टोबर, १९५६ रोजी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि आपल्या अनुयायांनाही नवयान बौध्द धम्माची दीक्षा दिली होती. त्यामुळे या भूमीला ‘दीक्षाभूमी’ म्हटले गेले. काही कालावधीनंतर येथे एक भव्य स्तूप उभारला गेला. दीक्षाभूमीच्या या भव्य बौध्द स्तूपाप्रमाणे आकारामुळे याला 'धम्मचक्र स्तूप' असेही म्हटले जाते.

दीक्षाभूमीला वर्षभर बौद्ध अनुयायी व पर्यटक भेट देत असतात मात्र अशोक विजयादशमी किंवा १४ ऑक्टोबर रोजी यांच्या संखेत लक्षणिय वाढ होऊन लक्षावधी लोक येथे आलेले असतात. भारतातील व विदेशातील, मुख्यत्वे जपान, थायलंड आणि श्रीलंका येथील अनेक अनुयायी व प्रसिद्ध व्यक्ती या स्थळास भेट असतात. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाने दीक्षाभूमीला 'अ' वर्ग पर्यटन स्थळ म्हणून घोषित केले आहे.

२. **शांतीवन, चिचोली ता. जि. नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील चिचोली येथे शांतीवन संग्रहालय आहे. येथे परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेख आणि त्यांच्या वापरात आलेल्या वस्तू संग्रहालयात ठेवलेल्या आहेत. जसे कोट, टोपी, टाय, वकालत कोट, लालटेन, खुर्ची, इ. तसेच येथे डॉ. भीमराव आंबेडकर यांनी भारतीय संविधानाचा मसुदा तयार केलेला टाईपरायटर सुध्दा ठेवलेला आहे. येथे दरवर्षी मोठ्या संख्येने अनुयायी भेट देतात.

३. **नागलोक इंस्टिट्युट ऑफ बुध्दीझम, कामठी, जि. नागपूर :** नागलोक हे बौद्ध तीर्थक्षेत्र आणि नागपूरातील पर्यटन स्थळ आहे, लाखो भारतीयांसाठी येथील वॉकिंग बुद्ध मूर्ती एक प्रमुख प्रेरणादायक तीर्थक्षेत्र आहे. सदरची बुध्द मुर्ती ५० फुट उंच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासह येथे सुंदर, शांत परिसर आहे. येथे २ मेडिटेशन हॉल, २ सभागृह व निवासी वस्तीगृह आहे.

१५ एकर परिसरामध्ये स्थानिक, जागतिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. यात बौद्ध धर्म, ध्यान आणि सामाजिक सक्रियतेबाबत निवासी प्रशिक्षण, नागार्जून प्रशिक्षण संस्थेद्वारे आयोजित केले जातात. नागलोक हे आज भारतातील एक प्रमुख बौद्ध केंद्र आहे.

**४.ड्रॅगन पॅलेस, ता. कामठी जि. नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यात वसलेले हे बौध्द तिर्थस्थळ नागपूर शहरापासून २० किलोमीटर अंतरावर नागपूर-जबलपूर रस्त्यावर आहे. ड्रॅगन पॅलेस हे विशाल बौध्द विहार आहे. सन १९९९ मध्ये १० एकरच्या विस्तीर्ण परिसरात बांधण्यात आलेले हे विहार शांतीपूर्ण बौध्द प्रार्थना केंद्र आहे. येथील बुध्दमुर्ती ही एका सलग चंदनाच्या ठोकळ्यापासून बनविलेली एक सुंदर मूर्ती आहे. ड्रॅगन पॅलेस मंदिर हे ‘लोटस टेंपल’ (कमळ मंदिर/कमळ विहार) नावाने ओळखले जाते. ओगावा सोसायटी द्वारे हे मंदिर बांधण्यात आलेले आहे.

**ई)** **नाशिक टूर सर्कीट :**

**१. बौध्दकालीन पांडव लेणी :**

नाशिकच्या पांडव लेणी या प्रसिध्द आहेत. नाशिक नवीन बसस्थानकापासुन ५ व महामार्ग बसस्थानकापासुन ४ कि.मी. अंतरावर एका मोठ्या टेकडीवर या लेण्या आहेत. या लेणी प्राचीन आहेत. सुमारे २५०० वर्षापूर्वीची. येथे जो पाली भाषेतील शिलालेख आहे त्यावरुन ही लेणी २००० वर्षापूर्वीचीच असल्याचे निश्चित समजले जाते. एकूण १८ लेणी आहेत. काही लेण्या व त्यातील मूर्त्या चांगल्या स्वरुपात आहेत.

**२. त्रिरश्मी बुध्द विहार :**

त्रिरश्मी बौद्ध लेणी ही सुमारे इ.स. पूर्व २०० च्या दरम्यान खोदलेली बौद्ध लेणी आहेत. भारत सरकारने या लेण्यांना महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून दि.३ एप्रिल, इ.स. १९१६ रोजी घोषित केले आहे. सातवाहन राजांनी ही लेणी खोदण्यासाठी वेळोवेळी दान दिले असा उल्लेख येथील शिलालेखांत आढळून येतो.

**३. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुक्तीभूमी स्मारक- येवला :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुक्तिभूमी स्मारक) हे नाशिक जिल्ह्यातील येवला येथील एक स्मारक-संग्रहालय आहे. हे स्मारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सर्मपित आहे. दि.२ एप्रिल २०१४ रोजी या स्मारकाचे लोकार्पण करण्यात आले.

**४. काळाराम मंदीर :**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारणासाठी जे लढे त्यामध्ये काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाचे महत्त्वाचे स्थान आहे. फक्त हिंदूंनाच नव्हे तर सत्ताधारी इंग्रजांनाही जाग यावी आणि त्यावेळच्या दलितांना, शोषितांना सर्व मूलभूत हक्क मिळावेत यासाठी त्यांनी हा लढा उभारला होता. दलितांना मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी कर्मवीर बी. के. दादासाहेब गायकवाड आणि भारतरत्न डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी मंदिराबाहेर आंदोलन केले. मंदिरात प्रवेशाचा हक्क मिळावा, ही चळवळ सर्वांना समान हक्कासाठीची होती.


**अधिक माहितीसाठी, आमच्याशी संपर्क साधा:**

मुंबई : अजित- ९९६७२५३४०६
अथर्व- ९१३०७७३१७५
नागपूर : पंकज : ९६६५८५२०२१
रजनी: ९७६४४८१९१३
नाशिक: पंकज: ९८५०१७७९११


*****